आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ मे २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी राज्यातल्या यंत्रणा सज्ज
- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यासाठी जोरदार प्रचार सुरू / आपल्या सरकारमध्ये भ्रष्टाचाराला थारा नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही
- कल्याणीनगर कार अपघात प्रकरणी विशाल अगरवाल आणि सुरेंद्र अगरवाल यांच्या पोलीस कोठडीत ३१ मे पर्यंत वाढ

**आणि**

- छत्तीसगडमधल्या विविध चकमकींमध्ये सामील असलेल्या नक्षलवाद्याचं गडचिरोलीत केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढं आत्मसमर्पण

<><><><><>

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी राज्यातल्या सर्व यंत्रणा सज्ज असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाची महत्त्वाची बैठक आज मुंबईत झाली. या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. हवामान इशाऱ्या संदर्भात महत्त्वाची माहिती नागरिकांना वेळेत कळावी, यासाठी हवामान विभागातल्या अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन, मान्सून पूर्व घ्यायची काळजी, जाहिरातीचे फलक, दरड कोसळण्याची ठिकाणं, मुंबईतल्या वस्त्या अशा विषयांवर चर्चा झाली. तसंच मराठवाड्यातला दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि गारपीटीच्या

पंचनाम्यांची प्रक्रिया यांवरही चर्चा झाली. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी सर्व राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे. रालोआ आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी आज देशात विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज झारखंडमधल्या डुमका आणि पश्चिम बंगालमधल्या उत्तर चोवीस परगणा जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. या दोन्ही सभांमध्ये मोदी यांनी इंडिया आघाडीवर जोरदार टीका केली. इंडिया आघाडी आणि घटक पक्ष भ्रष्टाचाराचं सर्वात मोठं उदाहरण आहेत, असं ते झारखंडमधल्या सभेत म्हणाले. आपल्या सरकारच्या काळात महिलांचं सक्षमीकरण झाल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

आपल्या सरकारमध्ये भ्रष्टाचाराला अजिबात थारा दिला जात नसल्याची ग्वाही मोदी यांनी पश्चिम बंगालमधल्या सभेत दिली. काँग्रेस आणि इंडिया आघाडीला सामान्य माणसाची काहीही पर्वा नाही, त्यांना फक्त स्वतःचं हित साधायचं आहे, असा आरोप त्यांनी केला.

तर, महागाई आणि बेरोजगारी कमी करण्यात भाजपा अयशस्वी ठरल्याची टीका काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी केली आहे. हिमाचल प्रदेशात गगरेट इथल्या प्रचारसभेत त्या बोलत होत्या.

<><><><><>

सरकारी योजनांचा लाभ सर्व नागरिकांना मिळावा, या उद्देशानं यवतमाळ जिल्ह्यातल्या आदिवासी गावांसाठी अभिनव उपक्रम राबवला आहे. जिल्ह्यातील

पांढरकवडा इथल्या आदिवासी विकास प्रकल्पातर्फे सरकारी योजनांची माहिती आणि त्याच्या लाभापासून वंचित असलेल्या ४०० आदिवासी गावांतील सरपंचांना क्युआर कोर्ड असलेलं पोस्टकार्ड पाठवलं आहे. हा क्युआर कोड स्कॅन केल्यावर प्रकल्प कार्यालयाचं संकेत स्थळ उघडलं जाऊन आदिवासी विकास विभागाच्या योजनांची सविस्तर माहिती लाभार्थ्यांना बसल्या ठिकाणी मिळणार आहे.

क्युआरकोड स्कॅन करून समोर येणाऱ्या योजनांची माहिती गरजू लोकांपर्यंत द्यावी आणि त्यांना या योजना मिळवून देण्यासाठी सहकार्य करावं असं आवाहन प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांनी केलं आहे.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात विविध तलाव आणि धरणांमधला गाळ काढण्याचं काम लोक सहभागातून सुरू आहे. या कामात सामाजिक संस्था आणि शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं, तसंच हा गाळ शेतकऱ्यांनी शेतामध्ये घेऊन जावा असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज संविधान सदनात सेंट्रल हॉलमध्ये वीर सावरकर त्यांना पुष्पांजली वाहिली.

राज्यपाल रमेश बैस यांनी वीर सावरकर मुंबईत राजभवनात सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

वीर सावरकर यांच्या देशभक्तीला, प्रेरणादायी विचार आणि तेजस्वी व्यक्तिमत्वाला नमन असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मुंबईतल्या शासकीय निवासस्थानी वीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केलं. रत्नागिरीत मध्यवर्ती कारागृहातल्या सावरकर स्मारकात सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

तुळजापुरात स्वातंत्र्यवीर सावरकर विचार मंचानं आज सावरकर चौक इथं सावरकरांच्या प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

<><><><><>

पुण्यातल्या कल्याणीनगर कार अपघात प्रकरणी विशाल अगरवाल आणि सुरेंद्र अगरवाल यांच्या पोलीस कोठडीत न्यायालयानं ३१ मे पर्यंत वाढ केली आहे. पुणे पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकानं पुढच्या तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली होती. दरम्यान, या अपघातातल्या अल्पवयीन आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार केल्याप्रकरणी राज्य सरकारनं स्थापन केलेल्या तीन सदस्यीय समितीनं आज ससून रुग्णालयात चौकशी केली. या घटनेचा तपास केला जाईल आणि संबंधित सर्वांची चौकशी केली जाईल असं समितीच्या अध्यक्ष डॉ. पल्लवी सापळे यांनी सांगितलं. दरम्यान काल या प्रकरणी अटक केलेल्या दोन डॉक्टरांसह तिघांना सत्र न्यायालयानं ३० मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

<><><><><>

या प्रकरणाची चौकशी सीबीआयतर्फे केली जावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्यात एकीकडे दुष्काळाचा गंभीर प्रश्न आहे, तर दुसरीकडे मद्यपान आणि अंमली पदार्थांच्या नशेत लोकांना गाडीखाली चिरडलं जात आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

पुण्यामधल्या ससून रुग्णालयाच्या गेल्या ५ वर्षांच्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढून रुग्णालय प्रशासनाबाबतच्या तक्रारी दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी  मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी केली आहे. काही दिवसांपूर्वी अमली पदार्थ तस्करी प्रकरणी, तर आता कल्याणीनगर 'हिट अँड रन' प्रकरणी ससून रुग्णालयाची प्रतिमा डागाळली आहे. या पार्श्वभूमीवर  रुग्णालय प्रशासनाच्या कामकाजाची समीक्षा गरजेची असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

छत्तीसगड राज्यात विविध चकमकींमध्ये सहभाग असलेल्या एका नक्षलवाद्यानं आज गडचिरोलीत केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. २०१७ मध्ये छत्तीसगडच्या मिरतूर आणि २०२२ मध्ये तिम्मेनार इथं झालेल्या चकमकींमध्ये त्याचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनानं त्याच्यावर ५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. २०२२ पासून आतापर्यंत २२ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या शेअर बाजारात आज दिवसभर चढ उतार दिसून आले. गेल्या सत्रात उच्चांकी पातळी गाठणारे निर्देशांक, आज दिवस अखेर विक्रीचा जोर राहिल्यानं  दिवसभरातल्या नीचांकी पातळीवर बंद झाले.

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज २२० अंकांनी घसरला आणि ७५ हजार १७० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४४ अंकांनी घसरला आणि २२ हजार ८८८ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

हरियाणातल्या डेरा सच्चा सौदाचा प्रमुख गुरमीत राम रहीम याच्यासह इतर चौघांना रणजीत सिंह खून प्रकरणात चंडीगढ उच्च न्यायालयानं निर्दोष मुक्त केलं आहे. रणजीत सिंह यांची १० जुलै २००२ रोजी गोळ्या झाडून हत्या केल्याप्रकरणी सीबीआय न्यायालयानं या सर्वांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. हा निर्णय आज चंडीगढ उच्च न्यायालयाने रद्द केला आणि दोषींची निर्दोष मुक्तता केली.

<><><><><>

मुंबईत धारावी परिसरातल्या काळा किल्ला भागात आज सकाळी एका गोदामाला लागलेल्या आगीत सहा जण जखमी झाले. अग्निशामन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणून गोदामात अडकलेल्यांची सुटका केली. जखमींना सायन रुग्णालयात दाखल केल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

आज मासिक पाळी स्वच्छता दिवस आहे. मासिक पाळी बाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी आणि महिलांना मासिक पाळी दरम्यान स्वच्छतेच्या सुविधा सहज उपलब्ध करून देण्याबाबत जनजागृती करण्यासाठीची ही एक जागतिक चळवळ आहे. ‘मासिक पाळीबाबत अनुकूल जग’ ही यंदाची संकल्पना आहे.

<><><><><>

मिझोराममध्ये आज सकाळी दरड कोसळून किमान १२ जणांचा मृत्यू झाला. राजधानी ऐझवलपासून चार किलोमीटर अंतरावरच्या ल्हिमेन इथं ही घटना घडली. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या

काही दिवसांपासून मुसळधार पावसानं मोझारममधलं जनजीवन विस्कळीत झाली आहे.

<><><><><>

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या चार दिवसांमध्ये केलेल्या विविध कारवायांमध्ये एकूण १० किलो ६०० ग्रॅम सोनं आणि ८ कोटी ६८ लाख रुपये किमतीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची तस्करी उघडकीला आणली असून, ३ जणांना अटक केल्याचं  सीमाशुल्क विभागानं काल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या व्यतिरिक्त  ३१ प्रकरणांमध्ये परदेशी चलन देखील  जप्त केल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल संघटित मानवी तस्करी आणि सायबर गुन्हेगारीशी संबंधित पाच संशयित आरोपींना ताब्यात घेतलं. राज्य पोलीस दलांच्या  सहयोगानं राबवलेल्या या मोहिमेत एनआयए नं देशातली एकूण सहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १५ ठिकाणी  छापे टाकले. यावेळी  डिजिटल उपकरणं, पासपोर्ट आणि बनावट रोजगार पत्र, यासारखं गुन्हेगारी स्वरूपाचं साहित्य जप्त करण्यात आलं.

<><><><><>

पश्चिम रेल्वेच्या पालघर रेल्वे स्थानकात मालगाडीचे जवळपास ७ डब्बे आज संध्याकाळी रुळावरून घसरले. यामुळे पश्चिम रेल्वेची मुंबईच्या दिशेने जाणारी सेवा विस्कळीत झाली आहे. सध्या मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्या विविध रेल्वे विविध स्थानकांवर थांबवण्यात आल्या आहेत.

<><><><><>

पुण्यात खराडी बायपास भागात काल रात्री एका ट्रकनं दुचाकी वाहनाला धडक देऊन झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर एकजण गंभीररीत्या जखमी झाला. पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस आज दक्षिण अरबी समुद्र आणि मालदीवच्या आणखी काही भागात  दाखल झाला. येत्या ३ ते ४ दिवसांमध्ये, तो दक्षिण अरबी समुद्राचा आणखी काही भाग, मालदीव आणि कोमोरीनचा उर्वरित भाग, लक्षद्विपचा काही भाग, केरळ, तसंच बंगालच्या उपसागराचा आणखी काही भाग आणि ईशान्येकडच्या राज्यांच्या काही भागात पुढे सरकण्यासाठी  परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

येत्या दोन दिवसांत कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडं राहील. तर विदर्भात उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//